ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - XI Issue - III July - September - 2022

English / Marathi Part - I

Peer Reviewed Refereed
and UGC Listed Journal
Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2020 - 6.306
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖
Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

The information and views expressed and the research content published in this journal, the sole responsibility lies entirely with the author(s) and does not reflect the official opinion of the Editorial Board, Advisory Committee and the Editor in Chief of the Journal **"AJANTA"**.

Owner, printer & publisher Vinay S. Hatole has printed this journal at Ajanta Computer and Printers, Jaisingpura, University Gate, Aurangabad, also Published the same at Aurangabad.

**Printed by**

Ajanta Computer, Near University Gate, Jaisingpura, Aurangabad. (M.S.)

**Printed by**

Ajanta Computer, Near University Gate, Jaisingpura, Aurangabad. (M.S.)

Cell No. : 9579260877, 9822620877, Ph. No. : (0240) 2400877

E-mail : ajanta3535@gmail.com, www.ajantaprakashan.com

**AJANTA - ISSN 2277 - 5730 - Impact Factor - 6.306** (www.sjifactor.com)

# CONTENTS OF ENGLISH PART - I


| S. No. | Title & Author | Page No. |
|---|---|---|
| 1 | Lexical Challenges in Translating Business English Texts<br>**Abdullah Mohammed Salem Alawi**<br>**Dr. Ramesh Chougule** | 1-7 |
| 2 | Use of Information and Technology in the Library<br>**Dr. Pramod Narayan Alone** | 8-11 |
| 3 | A Successful Single Dad<br>**Dr. Deepika Rai** | 12-16 |
| 4 | Gender and Cultural Inequality in the Thakur's Well<br>**Dr. Ravi S. Walke** | 17-23 |
| 5 | Diversity of Macrophytes of Gudgaon Lake of Bhadrawati Tehsil, District - Chandrapur (M.S.), India<br>**Harney N. V.** | 24-28 |
| 6 | A Study of Relation between Unemployment and Economic Growth in India<br>**Dr. Rajni Kant Trivedi** | 29-35 |
| 7 | Correlation, Training Workers of Health Care Setting in Regards to Biomedical Waste<br>**Dr. Diwakar Pradhan**<br>**Dr. Mayank Pradhan** | 36-42 |
| 8 | Government Policy and Program for Development of Rajasthan<br>**R. L. Nirmale** | 43-49 |
| 9 | Buddhism: Scientific Paradigm<br>**Avinash G. Narwade**<br>**Prof. Dr. S. M. Sonone** | 50-52 |
| 10 | Arbuscular Mycorrhizal Fungus Accompanying Brinjal (*Solanum melongena* L.) Rhizosphere Soil<br>**Patale S. W.** | 53-56 |
| 11 | Online vs. Paper Exams: Perceptions of Professional Courses Students<br>**Mr. Dinesh Atmaram Borase** | 57-60 |
| 12 | On Some Transformations of Basic Hypergeometric Series<br>**Dr. Jayprakash Yadav** | 61-64 |

# CONTENTS OF ENGLISH PART - I


| S. No. | Title & Author | Page No. |
|---|---|---|
| 13 | A Study of Consumer Behaviour towards Online Education<br>**Saurabh Sanjay Patil**<br>**Dr. Pravin Govind Shastri** | 65-73 |
| 14 | Challenging Patriarchal Prevalence by the Women Characters in the Novels of Arundhati Roy and P. Sivakami: A Study<br>**Dr. Swati Ramchandra Bhutale** | 74-79 |
| 15 | Toxic Effect on Growth and Reproduction of Freshwater Pulmonate Snail *Indoplanorbis exustus*<br>**Archana Mantale**<br>**Meena Patil** | 80-86 |
| 16 | Host Preference of *Callosobruchus* on Different Pulses<br>**Ayushi Bajpai**<br>**Dr. Barish James** | 87-93 |

VOLUME - XI, ISSUE - III - JULY - SEPTEMBER - 2022
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 6.306 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - I



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | मराठा कालखंडातील स्त्री - जीवन<br>**प्रा. भावसार जे. आर.** | १-५ |
| २ | मेळघाट आणि आदिवासी स्त्रियांचे लोकसाहित्य<br>**प्रा. गणेश शरदराव वैरागडे**<br>**डॉ. काशीनाथ बऱ्हाटे** | ६-११ |
| ३ | ग्रामिण भागातील माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांमधील पर्यावरण विषयक जाणीव जागृतीचा अभ्यास<br>**डॉ. एकनाथ द. वाजगे** | १२-१६ |
| ४ | दिवसशाळा आणि रात्रशाळा यांमधील उच्च माध्यमिक स्तरीय विद्यार्थ्यांच्या जीवन, मानवता, देश व धर्म यांविषयीच्या अभिवृत्तींचा तुलनात्मक अभ्यास<br>**मनिषा संतोष जाधव**<br>**डॉ. प्रशांत काळे** | १७-२२ |
| ५ | आ. य. पवार यांची निसर्ग कविता<br>**डॉ. संभाजी शिवाजी जाधव** | २३-२७ |
| ६ | आदिवासी लेखकांच्या कादंबरीतील सामाजिक जीवन (तृष्णा, शिबली)<br>**पाडवी सुंदर पेचरा**<br>**प्रा. डॉ. आशुतोष पाटील** | २८-३२ |
| ७ | भारतातील दारिद्र एक समस्या,परिचय व निर्मूलन<br>**सहा. प्रा. गायकवाड आर. जे.** | ३३-३८ |
| ८ | हवामान बदल आणि भारतीय कृषी<br>**प्रा. डॉ. मुजमुले बी. एस.** | ३९-४३ |
| ९ | दत्तपुराणातील शास्त्रांसंबंधी विरोधांचा परिहार<br>**विजय शर्मा** | ४४-४८ |
| १० | स्त्रीयांचे शिक्षण-आजच्या शिक्षणातील समस्या<br>**प्रजाला प्रकाश जोगदंड** | ४९-५४ |
| ११ | प्रवीण बांदेकर यांच्या कादंबऱ्यातील निवेदनशैलीचे स्वरूप व विशेष<br>**वाल्मीक विष्णू वाघमारे** | ५५-६० |

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १२ | औरंगाबाद शहरातील माध्यमिक स्तरावरील सहशालेय उपक्रमांमध्ये पालकांच्या सहभागाचा त्यांच्या पाल्यांच्या शैक्षणिक श्रेणी संपादणुकीवर होणाऱ्या परिणामाचा अभ्यास<br>**मिरा बाबुराव गवळी - कांबळे**<br>**डॉ. पी. बी. पगारे** | ६१-६८ |

# १२. औरंगाबाद शहरातील माध्यमिक स्तरावरील सहशालेय उपक्रमांमध्ये पालकांच्या सहभागाचा त्यांच्या पाल्यांच्या शैक्षणिक श्रेणी संपादणुकीवर होणाऱ्या परिणामाचा अभ्यास

**मिरा बाबुराव गवळी - कांबळे**
संशोधक विद्यार्थीनी, शिक्षणशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद. (महा.)
**डॉ. पी. बी. पगारे**
मार्गदर्शक, विभागप्रमुख, शिक्षणशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद. (महा.)

**प्रास्ताविक**

भारतीय घटनेतील मार्गदर्शक तत्त्वांतर्गत असुधारित तरतूदीप्रमाणे कलम ४५ नुसार ६ ते १४ वर्षे वयोगटातील सर्व मुलांना मोफत आणि सक्तीचे प्राथमिक शिक्षण देणे आवश्यक होते. घटनेतील सदरच्या मार्गदर्शक तत्त्वाप्रमाणे प्राथमिक शिक्षण देण्याच्या दिशेने बरेच भरीव कार्य पार पाडण्यात आले तथापि शतप्रतिशत बालकांना प्राथमिक शिक्षण पूर्ण करणे शक्य झाले नाही ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. त्यामुळेच मा. सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिले आहे की, घटनेच्या कलम २१ प्रमाणे प्रत्येकाचा जीवन जगण्याचा हक्क तोपर्यंत अर्थपूर्ण राहणार नाही. जोपर्यंत प्रत्येकास गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळणार नाही. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयास अनुलक्षुन केंद्र शासनाने ८६ व्या घटनादुरूस्ती द्वारे २१ अ या कलमाचा घटनेत समावेश केला व विधेयकाचा नमुना प्रत्येक राज्यात पाठविला व प्रत्येक बालकास समान गुणवत्तेचे शिक्षण देण्याची कायदेशीर तरतूद करण्याबाबत राज्य शासनास कळविले.

**मुदलियार आयोगानुसार**

केवळ अभ्यासक्रम राबविणाऱ्या शाळा विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व पुर्णत: कधीच घडवू शकत नाही तर प्रत्येक शाळेचे भवितव्य हे त्या शाळेने अभ्यासक्रमाबरोबर आयोजित करित असलेल्या अभ्यासानुवर्ती उपक्रमावरती ही अवलंकबून असते. कारण विद्यार्थ्यांच्या चारित्र्याची जडणघडण ही अभ्यासानुवर्ती व अभ्यासेत्तर उपक्रमातील सहभागाने घडत असते. म्हणूनच मुदलियार आयोगाने अभ्यासानुवर्ती व अभ्यासेत्तर अभ्यासपुरक उपक्रमांना अनन्यसाधारण महत्त्व दिले आहे.

**अभ्यासानुवर्ती उपक्रम**

समासमारंभ   मिरवुणक   सहल   स्नेहसंमेलन   विज्ञानप्रदर्शन   वार्षिक अंक

**अभ्यासेत्तर उपक्रम**

विद्यार्थी स्वयंशासन मंडळ   पुस्तकपेठी   विद्यार्थी वस्तुभांडार   वस्तीगृह व्यवस्था

प्रस्तुत उपक्रमाचा अभ्यासाशी प्रत्यक्षात संबंध येत नसला तरी सामाजिक व सहकार्याचे मूल्य विकसित करण्यासाठी असे उपक्रम उपयोगी ठरतात.

**सहशालेय उपक्रम**

| अ) वैयक्तिक स्वरूपाचे उपक्रम | ब) सामुदायिक स्वरूपाचे उपक्रम | क) शाळा स्तरावरील उपक्र |
|---|---|---|
| १. कार्यानुभव | १.वर्ग सफाई | १. प्रजासत्ताक दिन |
| २. योगा आसने | २. आवारसफाई | २. स्वातंत्र्यदिन |
| ३. वक्तृत्व स्पर्धा | ३. वर्ग सजावट | ३. निरोप समारंभ |
| ४. विज्ञान उपकरण निर्मिती | ४. समुहगीत गायन | ४. शिक्षक पालक संघ |
| ५. नाट्यीकरण | ५. हस्तलिखित | ५. स्नेह संमेलन |
| ६. संग्रह | ६. श्रमसंस्कार शिबिर | ६. ग्रामसफाई |
| ७. स्पर्धा (हस्ताक्षर, चित्र, रांगोळी) | ७. सहल | ७. प्रौढ साक्षरता वर्ग |
| | ८. बालवीर-विरबाला पथक | ८. बोलक्या भिंती / भित्तीपत्रक |
| | ९. प्रश्नमंजूषा | |
| | १०. सामुदायिक वाचन | |

शाळा हे व्यक्तिमत्त्व विकासाचे प्रमुख केंद्र आहे. शाळेमध्ये अभ्यासक्रम पाठ्यपुस्तके यांच्या साह्याने शिक्षणाचे उद्दिष्टे साध्य करीत असताना कृतिशीलतेची जोड हवी ही कृतिशीलता विविध सहशालेय उपक्रमांतून व अभ्यासपुरक उपक्रमातून देता येते. भारतीय विचारवंत. थोर शिक्षण शास्त्रज्ञ नोबेल पारितोषिक विजेते व शिक्षणक्षेत्रात अत्यंत मोलोच कार्य करणारे रविंद्रनाथ टागोर म्हणतात, उच्च प्रतिचे शिक्षण त्यालाच म्हणावे जे केवळ माहिती देत नाही तर चराचर सृष्टीशी आपल्या जीवनाचा मेळ घालून देते. केवळ पुस्तकी ज्ञानाने विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास होणार नाही. त्याला सहशालेय उपक्रमांची जोड द्यावीच लागेल.

आपल्याकडे विद्यार्थी शिक्षणाबाबत सदैव दक्ष असणाऱ्या पाकांची संख्या कमी आहे. तर दुसरीकडे मुलांकडे दुर्लक्ष असणाऱ्या पालकांची संख्या मात्र प्रचंड मोठी दिसते. याबाबतीत आपण आत्मपरीक्षण केले तर आपल्याला घरे पालकाची व शाळा शिक्षकांची ही भावना पालकांच्या मनात खोलवर रूजल्याचे दिसते. आपल्या शिक्षण प्रक्रियेत पालक प्रबोधनाचा विचार फारसा रूजलेला मुरलेला नाही. शिक्षक म्हणजे पगारदार नोकर असून शिक्षण हे अर्थाजनाचे साधन आहे. या भूमिकेशी ते आजही ठाम आहे. समाजामध्ये एक पालकवर्ग असाही आहे की जो उच्चशिक्षित आहे. आर्थिक संपन्नता आहे. परंतु वेळ नाही. आपल्या बालकाला जे पाहिजे ते देण्याची तयारीपण नोकरी व्यवसायामुळे वेळेची कमतरता आहे. तसेच एक पालकवर्ग असाही आहे जो निम्मशिक्षित व आर्थिक विपन्नता असल्यामुळे बालकाच्या मागण्यापूर्ण करू शकत नाही व कमी शिक्षित असल्यामुळे सहशालेय उपक्रमाविषयी अज्ञानी असतात त्यामुळे बालकांना कोणतीही प्रेरणा मिळत नाही.

शिक्षक पालक मुख्याध्यापक यांच्यातील संवाद आजकल दिवेसंदिवस संपत चालल्याचे चित्र शैक्षणिक विश्वात पाहण्यास मिळत आहे. बालकांच्या हिताविषयी चिंता बाळगणाऱ्या पालक व शिक्षक या दोन घटकात जर विसंवाद निर्माण

झाला तर त्याचे व्यक्तिमत्त्व दुभंगेल व अशी दुभंगलेली व्यक्तिमत्त्व तयार होणे म्हणजे भारताचे भविष्य धोक्यात येण्यासारखे आहे. शाळेतील शिक्षण प्रक्रियेत शिक्षकांनी पालकांच्या वैचारिक व सक्रिय सहभाग स्विकारणे व पालकांचे विधायक संघटन करून शाळेची सर्व क्षेत्रातील गुणवत्ता वाढीसाठी पालक संघटनेचा उपयोग करावा व पालक वर्गानी सुद्धा आपल्या पाल्यासाठी वेळ काढून त्याच्याविषयी माहिती घेत रहावी त्याचप्रमाणे सहशालेय उपक्रम सर्वांगिण गुणवत्ता वाढीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावतात.

**संशोधनाची गरज**

लोकसंख्या व ज्ञानाच्या प्रचंड प्रस्फोटामध्ये विद्यार्थ्यांची संख्या वाढली वर्ग खच्चून भरले गेले त्यामुळे प्रत्येक मुलांकडे शिक्षकांना वैयक्तिक लक्ष्य देणे शक्य नाही. त्याचप्रमाणे खाजगी शाळामध्ये विनाअनुदानित व कायमविनाअनुदानित धोरणामुळे शिक्षकांना नोकरीची हमी नसणे. वाढती महागाई व कमी पगार नोकरीसाठीची स्पर्धा इत्यादी कारणामुळे असमाधानी शिक्षक संस्थाचालकाच्या मुख्याध्यापकाच्या व इतर घटकांच्या दबावाखालील शिक्षक कसे भारताचे भविष्य निर्माण करू शकतात.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज - या कोवळ्या कळ्यामाजी लपले रविंद्र शिवाजी जॉन ड्युई - १८९६ साली त्यांना शिकागो येथे एक शाळा स्थापन प्रयोगशाळा नाव दिले त्यांनी आपले विचार मांडले की सामाजिक जबाबदारी सहयोगी वृत्ती व सामाजिक कार्यक्षमता यांचा विकास होण्यासाठी आत्माविष्काराची संधी मिळते, कृतीला, क्रीडात्मक स्वरूप देणे प्रयोगशाळा, अनेकविध हस्तव्यवसाय, छोटे-छोटे कारखाने, उपकरणी व यंत्रे, बगीचा शेती गृहोद्योग, शाळेचे दुकान चालविणे, शाळेची दुरूस्ती करणे इत्यादी कार्य केले जातात या कार्यक्रमामागे व त्यातून मिळणाऱ्या अनुभवांमागे एक निश्चित दृष्टी असते व ती म्हणजे त्यातून मुलांना शिक्षण मिळावे. त्यांच्या वैयक्तिक गरजा व प्रवृत्ती यांची तृप्ती व्हावी तसेच सामाजिक कार्यक्षमतेचा विकास व्हावा.

ड्यूईने संभाषण Converstation or Communication mebMeesOeve inquary or finding out things jÛevee construction or making things व कलात्मक अभिव्यक्ति Artistic expression या प्राथमिक व मूलभूत अभिरूची मानल्या आहेत त्याची तृप्ती करणे व ती करण्यासाठी अनुरूप कार्यक्रमांची योजना आखणे हे शाळेचे आद्य कर्तव्य आहे.

उपरोक्त विवेचनावरुन सहशालेय उपक्रमाचे महत्त्व आपल्या लक्षात येईल विद्यार्थ्यांच्या शालेय जीवनातील अविभाज्य घटकास दुय्यम स्थान देवून चालणार नाही अशा वेळी पालकांची भूमिका महत्त्वाची ठरते विद्यार्थ्यामधील उणीवा उदा. स्वच्छतेच्या सवयी, आहार मधल्यावेळेचे जेवण, चांगले मित्र मिळणे, अभ्यास व शारीरिक गरजा इ. पालकांच्या व शिक्षकांच्या सहकार्याशिवाय दूर करता येणार नाही. शाळेला पालकांचा उपयोग होईल व पाल्यास आपल्या पालकांविषयी आदर व जवळीकता वाढेल म्हणून पालकांनी आपापल्या वेळेनुसार शाळेच्या संपर्कात राहून शाळेविषयी अभ्यासक्रम व त्यातील बदलविणारी सहशालेय उपक्रम व त्यांची उपयोगिता तसेच विद्यार्थ्यांच्या प्रगतीविषयी जाणून घेणे पाल्याच्या

गुणवत्तापूर्ण सर्वांगिण विकास साध्य करण्यासाठी प्रयत्नरत राहणे काळाची गरज आहे. कारण या सर्व गोष्टींचा बालकांच्या संपादनुकीवर अर्थात त्यांच्या भविष्यावर परिणाम होतो.

संशोधिका स्वतः आसपासच्या शिक्षित-अशिक्षित पालकांची याविषयीची मनोवृत्ती जाणते व उपक्रमाविषयीचे पालकामधील अज्ञान अनुभवते व त्याचे दुष्परिणाम विद्यार्थ्यांमध्ये दिसतात. त्यामुळे प्रस्तुत विषयाची निवड करण्यात आली आहे.

**समस्येचे महत्त्व**

शाळेत केवळ धडे संपविण्यावर भर दिला गेल्याने कृतियुक्त उपक्रम अथवा सहशालेय उपक्रम दुर्लक्षित होतात व विद्यार्थी आनंददायी शिक्षणापासून वंचित होतात. असे होऊ नये म्हणून सहशालेय उपक्रम हे आनंददायी शिक्षण प्रक्रियेचे अविभाज्य अंग ठरते. आपली शिक्षण प्रक्रिया ही वर्गकेंद्रित व शिक्षण केंद्रित राहू नये तर विद्यार्थी केंद्रित बनावी वर्गातील सर्व मुलांना दर्जेदार शिक्षण मिळावे ह्या दृष्टिकोनावर जाणीवपूर्वक भर दिला पाहिजे. कृतिशील सहभाग मिळविता येईल कारण उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांना छोट्या छोट्या गटात शिकण्याची संधी मिळते छोट्या संधीमधूनच वैचारिक प्रगल्भता, अभिव्यक्तिकरण व व्यक्तिमत्त्वविकास चांगला घडू शकतो. विद्यार्थ्यांना आंतरिक आनंदप्राप्त होतो तसेच आत्मविश्वास वाढतो.

सहशालेय उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये संघभावना निर्माण होते. नेतृत्त्वभावनेचा विकास होतो. योग्य व अचुक निर्णयक्षमता वाढते व आत्मविश्वास वाढतो अर्थात विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास साधण्यासाठी अभ्यासपुरक उपक्रमाची नितांत आवश्यकता असते. परंतु ज्या धोरणाने शासनाने हे कार्य उपक्रम सुरू केले त्याचा आवश्यक तेवढा पाठपुरावा घेतल्या जात नाही.

त्याचप्रमाणे सहशालेय उपक्रमामध्ये विद्यार्थ्याने स्वतःहून सहभाग नोंदवावा पालकांनीही त्यात आवड दाखवावी रस घ्यावा. पालकांच्या शैक्षणिक, आर्थिक परिस्थितीचा सकारात्मकरित्या परिणाम विद्यार्थ्यांवर असावा पालकांच्या शैक्षणिक, आर्थिक परिस्थितीचा संबंध हा विद्यार्थी व त्यांच्या संपादणुकीशी येतो अर्थातच विद्यार्थ्यांच्या भविष्याशी येतो.

**गृहीतके**

१. पालकांच्या आर्थिक परिस्थितीचा परिणाम विद्यार्थ्यांच्या संपादनुकीवर होतो.

२. पालकांच्या शैक्षणिक परिस्थितीचा सकारात्मक परिणाम विद्यार्थ्यांच्या श्रेणी संपादनावर वर होतो.

३. शासन निर्णयानुसार सहशालेय उपक्रम माध्यमिक स्तरात प्रत्यक्ष राबविले जातात.

**उद्दिष्ट्ये**

१. माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी राबविल्या जाणाऱ्या शालेय उपक्रमाविषयी माहिती घेणे.

२. शालेय उपक्रमात पालकांच्या सहभागाचे स्वरूप जाणून घेणे.

३. पालकांची आर्थिक व शैक्षणिक परिस्थितीची माहिती घेणे.

४. पालकांचा शालेय उपक्रमातील सहभागाचा त्यांच्या पाल्यांचे शैक्षणिक श्रेणी संपादनुकीवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे

५. सहशालेय उपक्रमात पालकांचा अप्रत्यक्ष सहभाग वाढविण्यासाठी उपाययोजना सूचविणे.

**परिकल्पना**

१. उच्च माध्यमिक स्तरावरील इयत्ता ९ वीच्या विद्यार्थ्यांचा सहशालेय उपक्रमांतर्गत पालकांचा अज्ञानामुळे अंशतः सहभाग असावा.

२. उच्चशिक्षित पालकांच्या उच्च आर्थिक परिस्थितीचा पाल्याच्या शालेय संपादनुकीवर सकारात्मक परिणाम होत असावा.

३. पालकांचा सहशालेय उपक्रमांतील सहभाग व त्यांच्या पाल्याचे सहशालेय उपक्रमातील श्रेणी संपादनुकीचा सकारात्मक परिणाम होत असावा.

**गतसंशोधने**

जोशी, अ.स. (१९८३-८५), सहशालेय उपक्रमांतून शिक्षण समस्यांची समस्या 'नागपूर विद्यापीठ' पीएच.डी.

**अ) उद्दिष्टे**

१. सहशालेय उपक्रमाबद्दल जे विविध गैरसमज आहेत त्यांचे निराकरण करणे.

२. सहशालेय व उपक्रमांविषयी विद्यार्थ्यांच्या, शिक्षकांच्या व पालकांच्या मनात आस्था व आदर निर्माण करतात.

३. सहशालेय उपक्रमांमधून विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्त्व विकास घडवून मानवी सद्‌गुण व सद्‌भाव यांच्या आधारावरच अखेर जगाचे प्रश्न सोडविले जाऊ शकतात असा विश्वास निर्माण करणे.

**ब) कार्यपद्धती**

या विषयाच्या अनुषंगाने संशोधकाने आपल्या संशोधनात सर्वेक्षण पद्धती व प्रायोगिक पद्धतीचा वापर केला आहे. साधने म्हणून प्रश्नावली मुलाखती व निरीक्षण साधनांचा संशोधकाने संशोधनात वापर केला.

**क) निष्कर्ष**

१. सर्वसामान्य विद्यार्थ्यांचे वर्तन व जीवनक्रम तसेच त्यांच्या मानसिक वर्तन जीवनक्रम तसेच त्यांच्या मानसिक व वैचारिक स्थितीचे प्रतिबंध मोठ्या प्रमाणात वेगळे आढळले.

२. विद्यार्थ्यांच्या अंगी शिस्त बाणवली गेली.

३. सहशालेय उपक्रमामधून विविध गुणांची जोपासना वाढीस लागली.

**संशोधन पद्धती**

ऐतिहासिक संशोधनाचे उद्दिष्ट वर्तमान घटकांचा अर्थ लावण्याच्या दृष्टिने संदर्भ म्हणून भूतकालीन घटनांचा मागोवा घेणे आहे. सर्वेक्षण वर्तमान काळाशी संबंधित असून अभ्यास विषयांच्या विविध क्षेत्रातील वर्तमान स्थिती निश्चित करणे हा

**जनसंख्या**

सदर संशोधनात जनसंख्या म्हणजे संशोधनाकरिता नमुना ज्यातून निवडला आहे असा संपूर्ण भाग म्हणजे जनसंख्या नमुन्याची गुणवैशिष्टे ज्याच्याशी समान आहेत अशा व्यक्ति म्हणजे जनसंख्या होय.

**निष्कर्ष**

१. सहशालेय उपक्रमातील सहभागामुळे विद्यार्थी शैक्षणिक, बौद्धिक, शारीरिक व सामाजिक अर्थातच सर्वांगीण विकास घडतो.
२. सहशालेय उपक्रमात सुशिक्षित पालकांचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष सहभाग व पाठपुरावा अधिक जाणवतो.
३. शाळेत शैक्षणिक विषयासोबतच वर्तनात योग्य बदल घडवून आणण्यासाठी / सकारात्मक परिवर्तनासाठी सहशालेय उपक्रम राबविले जातात.
४. उच्च आर्थिक उत्पन्न असलेले व उच्च विद्याविभूषित पालक सहशालेय उपक्रमाचे महत्त्व जाणतात. त्यामुळे ८६ % विद्यार्थ्यांचे पालक त्यांना माहिती व साहित्य पूरवितात.
५. जीवनउपयोगी विविधांगी व्यक्तीमत्वविकास घडल्यामुळे १०० % विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो.
६. सहशालेय उपक्रमामुळे जास्तीची माहिती मिळते असा ७८ % विद्यार्थ्यांनी अभिप्राय व्यक्त केला.
७. सहशालेय उपक्रमातील स्पर्धा सहभागामुळे ९८ % विद्यार्थ्यांचा व्यायाम होतो, शारीरिक बळ वाढते, चपळता येते, सामान्य हालचाली होतात व एकाग्रता येते.
८. सहशालेय उपक्रमामुळे स्पर्धेनुसार कोणत्या ना कोणत्या गुणात भर पडते जसे मैदानी स्पर्धेमुळे शारीरिक चपळता वाढते.

**शिफारशी**

१. माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी सहशालेय उपक्रमामध्ये जास्तीत जास्त संख्येने सहभाग नोंदवावा.
२. वेगवेगळ्या सहशालेय उपक्रमामुळे वेगवेगळे गुण विकसित होतात. म्हणून सर्वच उपक्रमात सहभाग घ्यावा.
३. पालकांनी विद्यार्थ्यांना पाठिंबा, मार्गदर्शन व आर्थिक मदत करावी.
४. पालकांनी प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरित्या सहशालेय उपक्रमामध्ये रस दाखवावा, शिकक्षकाकडे चौकशी करावी.
५. शिक्षक, मुख्याध्यापकांनी जास्तीत जास्त पालकांशी संपर्क करून सहशालेय उपक्रमाचे महत्त्व पटवून द्यावे.
६. विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक परिवर्तनासाठी सहशालेय उपक्रम उपयोगी असून त्याकडे बघण्याचा नकारात्मक दृष्टीकोन बदलावा.
७. माध्यमिक शिक्षण मंडळाने सर्वच दृष्टीकोनातून परिक्षण करून हे सर्व उपक्रम माध्यमिक स्तरावर राबविण्यात येतात. त्यामुळे विद्यार्थी व पालकांनाही याला सकारात्मक प्रतिक्रिया द्यावी.

८. शिक्षक, पालक मेळावा, माता-पालक संघ, यांच्याद्वारे शाळेने पालकांशी वारंवार संपर्कात राहून जसे स्नेहसंमेलन, निकाल, मेळावा इत्यादीमधून पालकांमध्ये सहशालेय उपक्रमाविषयी जागरूकता घडवून आणावी.

९. माध्यमिक शाळांनीही जास्तीत जास्त वेगवेगळे सहशालेय उपक्रम राबवावेत व विद्यार्थ्यांना सहभागास प्रवृत्त करावेत.

१०. माध्यमिक शाळांनी सहशालेय उपक्रमासाठीचे आवश्यक ते साहित्य विद्यार्थ्यांना उपलब्ध करून द्यावे.

## संदर्भ सूची

१. भितांडे, वि. रा. (२००६), शैक्षणिक संशोधन पद्धती, पुणे : नुतन प्रकाशन.

२. मुळे, रां. श. व उमाठे, वि. सु. (१९९२), शैक्षणिक संशोधनाची मुलतत्त्वे, आवृत्ती, नागपूर : नुतन प्रकाशन.

३. पंडित, बि. वि. (२००५), शिक्षणातील संशोधन, पुणे : नित्य नूतन प्रकाशन.

४. भांडारकर, के. एस. (१९९८), सुलभ शैक्षणिक संख्याशास्त्र पुणे : नुतन प्रकाशन.

५. मुळावकर, सं. म. (२००५), मुल्यशिक्षण, सुसंवाद, नागपूर : विद्या प्रकाशन.

६. बापट, भा. गो. (१९८८), शैक्षणिक संशोधन, पुणे : नुतन प्रकाशन.

७. आगलावे प्र. (२०००), संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, नागपूर : विद्या प्रकाशन.

८. कदम, चा. [illegible]), शैक्षणिक संख्याशास्त्र, पुणे : नित्य नूतन प्रकाशन.

९. पाटील, वा. भा. (२०१२), संशोधन पद्धती, जळगाव : प्रशांत पब्लिकेशन्स.

१०. तिडके, सं. ([illegible]), संशोधन पद्धती (संपादीत), नाशिक : यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ.

११. भिंताडे, वि. रा. (२००८), शैक्षणिक संशोधन पद्धती, पुणे : नित्य नूतन प्रकाशन

१२. Buch, M.B. (978-82), 3rd Survey of Researching Education, New Delhi : NCERT Publication Department

१३. www.google.com

१४. www.bamu.net